
दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | सोमवार, 30 मार्च 2026 | | अंक क्र. 310 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com




# भाजपचा वटवृक्ष करण्यासाठी लोकनेते मुंडे साहेबांनी केलेले कष्ट मोलाचे



## मतदार नोंदणीची प्रक्रिया जोमाने राबवा

## पं. दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण कार्यशाळेचे ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते थाटात उदघाटन ; कार्यकर्त्यांना केले प्रेरणादायी मार्गदर्शन

परळी | वैजनाथ

भाजपला वाडी, वस्ती तांड्यावर नेण्याचे काम लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्यासह अनेक नेत्यांनी अहोरात्र परिश्रम घेऊन केले, त्यामुळेच पक्षाचा आज वटवृक्षासारखा विस्तार झालेला आपल्याला पहायला मिळत आहे. नेत्यांचे हे कष्ट आपल्याला कदापि विसरता येणार नाहीत, त्यांचे कष्ट आणि आदर्श समोर ठेवून कार्यकर्त्यांनी पक्षाचे संघटन आणखी मजबूत करावे असे  सांगत पक्षाची मतदार नोंदणी प्रकिया जोमाने राबवा असे आवाहन राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी आज येथे केले.



**भारतीय जनता पक्षाच्या परळी शहर तसेच पूर्व व पश्चिम मंडळाच्या वतीने आयोजित पंडित दिनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान कार्यशाळेचे उदघाटन ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते आज श्रध्दा मंगल कार्यालयात झाले, त्यावेळी त्या बोलत होत्या. भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, प्रवक्ते राम कुलकर्णी, ज्येष्ठ नेते दत्ताप्पा इटके, विकासराव डुबे, बंकटराव कांदे, जीवराज ढाकणे, श्रीहरी मुंडे, जुगलकिशोर लोहिया, संतोष हंगे, रमेश कराड, सतीश मुंडे, रामदास बडे, गणेश कराड, भाजपचे तालुकाध्यक्ष राजेश गिते, वसंत निर्मळ, शहराध्यक्षा उमाताई समशेट्टे, न.प. बांधकाम सभापती पवन मुंडे,श्रीराम मुंडे, तानाजी वाव्हळे, आदी उपस्थित होते.पुढे बोलताना ना. पंकजाताई म्हणाल्या,भारतीय जनता पक्ष राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुशीत वाढला आहे. राष्ट्र प्रथम ही आपली विचारधारा आहे. जनसंघापासून ते आतापर्यंत अनेक बदल झाले, राजकारणाच्या प्रत्येक टप्प्यावर आपला पक्ष बदलतो आहे. राष्ट्रप्रेमाने ओतप्रोत भरलेल्या भावनेने आणि एका शिस्तीने पक्ष चालतो आहे. देशातील प्रत्येक नागरिकाचे देशावर प्रेम असले पाहिजे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे हे ध्येय आहे आणि हीच भाजपची नीती देखील असल्याचे ना. पंकजाताई मुंडे म्हणाल्या.**

### मुंडे साहेबांचे कष्ट मोलाचे

लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांनी ज्याप्रमाणे पक्ष वाडी वस्त्यावर पोहोचवला प्रत्येक ठिकाणी मुंडे साहेबांसारखे व्यक्ती तयार झाले आणि पक्षाचा वटवृक्ष झाले. आपल्या पक्षाला एक इतिहास आहे, पक्षात विचार, संस्कार आणि नीतीला फार महत्व आहे.  'सत्ता हमारा ध्येय नही, संघर्ष हमारा नारा' आहे या भूमिकेतून आपल्या नेत्यांनी काम केल आहे. भाजप हा देशात एकमेव पक्ष आहे जो भारत मातेचे पूजन करतो. सर्वांना सोबत घेऊन देशभक्तीचे बीज भाजपने रोवले असल्याचे ना. पंकजाताई मुंडे म्हणाल्या.

### मतदार प्रक्रिया जोमाने राबवा

आपल्या पक्षाने अनेक चढउतार पाहिले आहेत. अनेकांना सोबत घेऊन पक्ष काम करतो आहे. देशात आणि अनेक राज्यात आपली सत्ता आहे, प्रधानमंत्री मोदीजी हे तीनवेळा प्रधानमंत्री झाले.परंतु सत्ता हे पक्षाचे साध्य कधीच नव्हते. सामान्य लोकांची सेवा करणे, देशप्रेमाची भावना वाढीस लावणे हे पक्षाचे ध्येय आहे. आपल्या पक्षात शिस्तीला महत्व आहे. पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी देशासाठी, पक्षासाठी बलिदान देऊन सर्वस्व अर्पण केले.  पक्षाचे विचार, कार्य तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवणे हे आपले ध्येय ठेवा. संघटनेप्रति प्रेम आणि आदर ठेवा.तळमळीने काम करा, प्रधानमंत्री स्वतः जीवतोड मेहनत घेत आहेत. मी स्वतः तहानभूक विसरून काम करत आहे. आता मतदार नोंदणी उपक्रम घरोघरी जावून राबवा, प्रत्येकाची नोंदणी करा, बीएलओ घरी येतील तेंव्हा आपले आणि परिवाराचे नाव नोंदवा हे काम बूथ प्रमुख म्हणून आपणच करू शकता असे आवाहन त्यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना केले.

# कडा येथे 'पंडित दीनदयाळ उपाध्याय' महाभियान 2026' शिबिराचा उत्साहात शुभारंभ

## सहा दिवस चार मंडळांतून कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद ; संघटन बळकटीसाठी मार्गदर्शन

आष्टी (प्रतिनिधी)

कडा येथील परमेश्वर मंगल कार्यालयात आष्टी व कडा मंडळाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'सक्षम कार्यकर्ता – सशक्त संघटन' या संकल्पनेवर आधारित 'पंडित दीनदयाळ उपाध्याय महाभियान 2026' या भव्य प्रशिक्षण शिबिराचा शुभारंभ अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. शिबिराच्या प्रारंभीच चारही मंडळांतील कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावत या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. पदाधिकारी, बूथप्रमुख, शक्तिकेंद्रप्रमुख तसेच युवा कार्यकर्त्यांचा विशेष सहभाग यावेळी पाहायला मिळाला.

या सहा दिवसीय प्रशिक्षण शिबिराचा मुख्य उद्देश कार्यकर्त्यांना वैचारिकदृष्ट्या सक्षम करणे, उर्वरित पान ३



# कन्हेरवाडी तलावातील पाणी न सोडल्यास 9 एप्रिलला महामार्ग रोखण्याचा इशारा

परळी | प्रतिनिधी

कन्हेरवाडी साठवण तलावातील पाणी नदीपात्रात सोडण्याच्या मागणीने आता तीव्र रूप धारण केले असून, प्रशासनाने वेळेत निर्णय न घेतल्यास आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्याचा इशारा देण्यात आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे प्रदेश सरचिटणीस राजेभाऊ फड यांनी याबाबत स्पष्ट भूमिका घेतली आहे.

दि. 18 मार्च 2026 रोजी तलावातील पाणी नदीपात्रात सोडण्याची मागणी प्रशासनाकडे लेखी स्वरूपात करण्यात आली होती. मात्र, आठ दिवस उलटूनही कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने संताप व्यक्त केला जात आहे.

सध्या उन्हाची तीव्रता वाढली असून, परिसरातील जलस्त्रोत आटले आहेत. गुरेढोरे आणि नागरिकांना पाण्यासाठी मोठी भटकंती करावी लागत आहे. कन्हेरवाडी तलावातील पाणी नदीपात्रात सोडल्यास कन्हेरवाडी, जिरेवाडी, जलालपूर, ब्रम्हवाडी, बँक कॉलनी, समता नगर आणि शंकर पार्वती नगर या भागातील जलपातळी वाढून दुष्काळी परिस्थितीतून काहीसा दिलासा मिळू शकतो.



राजेभाऊ फड यांनी इशारा दिला आहे की, दि. 8 एप्रिलपर्यंत पाणी सोडले नाही तर 9 एप्रिल रोजी जिरेवाडी बायपास येथे परळी-अंबेजोगाई महामार्गावर ग्रामस्थांसह लोकशाही मार्गाने रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल.

# भाजपा मुरुड मंडल नूतन पदाधिकाऱ्यांना आ. कराड यांच्या हस्ते नियुक्ती पत्राचे वाटप

## मुरुड शहराध्यक्षपदी महेश कणसे तर युवा मोर्चा अध्यक्ष किरण मुंडे

**लातूर** | भारतीय जनता पार्टी मुरुड मंडलातील नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते नियुक्ती पत्राचे वाटप करण्यात आले. मुरुड शहराध्यक्ष पदाची जबाबदारी महेश कणसे यांच्यावर देण्यात आली असून सर्व नूतन पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.




भारतीय जनता पार्टी मुरुड मंडल अध्यक्ष सुरज शिंदे यांनी भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या मार्गदर्शनाखाली ६१ जणांची कार्यकारिणी केली असून या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना रविवारी लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात आ. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते नियुक्ती पत्राचे वितरण करण्यात आले यावेळी भाजपाचे मंडलाध्यक्ष सुरज शिंदे, बन्सीभाऊ भिसे, प्रताप पाटील, साहेबराव मुळे यांच्यासह इतर अनेकांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मुरुड मंडळ सरचिटणीस विश्वास कावळे, ॲड. धनराज शिंदे, उपाध्यक्ष राजाभाऊ वैद्य, दत्ता सप्ताळ, बालाजी नाईकवाडे, वैजनाथ हराळे, रमेश शिंदे, रमाकांत गायकवाड, चिटणीस - गोविंद मुंडे, दीपक मगर, किशोर घुटे, सुखदेव बर्डे, लहूराजे सव्वाशे, श्रीकांत झाडके, बाळासाहेब देशमुख, कोषाध्यक्ष प्रशांत साखरे यांच्यासह कार्यकारणीतील सदस्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.

मुरुड शहराध्यक्ष महेश कणसे, मुरुड मंडळ युवा मोर्चा अध्यक्ष किरण मुंडे, सरचिटणीस आकाश करदुरे, महिला मोर्चा अध्यक्ष जनाबाई साखरे, एससी मोर्चा अध्यक्ष श्रीराम आदमाने, सरचिटणीस गौतम राऊत, ओबीसी मोर्चा अध्यक्ष किशोर सुडके, अल्पसंख्यांक मोर्चा अध्यक्ष अल्ताफ तांबोळी, सोशल मीडिया अध्यक्ष बालाजी गवळी, संयोजक विशाल मगर, किसान मोर्चा अध्यक्ष संजय सूर्यवंशी यांनाही आ. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते नियुक्ती पत्राचे वाटप करण्यात आले.

सर्व नवनिर्वाचीत पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून भाजपा नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी पक्ष संघटना मजबूत करण्याबरोबरच केंद्र आणि राज्य शासनाच्या योजना सर्वसामान्य गरजू आणि पात्र लाभार्थ्यापर्यंत पोहोचवाव्यात असे बोलून दाखवले. यावेळी भाजपाचे कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी सुरज शिंदे यांनी उपस्थितांचे आभार मानले.



## संपादकीय

# सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाला वाघाचा आधार लाभला!

चांदोलीच्या जंगलात तीन वाघ कॅमेऱ्यात कैद झाले तरी त्यांचे वास्तव्य येथे नाही या सत्यावर उपाय शोधत ताडोबा-अंधारी-तून सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाकडे 'तारा' या वाघिणीचे हस्तांतर या आठवड्यात झाले. हा दक्षिण महाराष्ट्राच्या जंगलांना मिळालेला नवजीवनाचा श्वास ठरू शकतो. तो तसाच ठरावा ही महाराष्ट्राच्या वन खात्याकडून अपेक्षा आहे. गेली अनेक वर्षे वाघांशिवाय पडझड अनुभवत असलेल्या चांदोली-कोयना पट्ट्याला या एका ऑपरेशनने नवी दिशा दिली आहे. पश्चिम घाटाच्या या दगडी कड्याकपारीत वाघ या शिखर-भक्षकाचा अभाव हा केवळ पर्यावरणीय मुद्दा नव्हता, तर संपूर्ण पर्यावरण व्यवस्थेचा तोलच ढासळलेला होता. जंगलाची पुनरुत्पादन क्षमता कमी झाली होती. 'तारा'चे आगमन हा या तुटलेल्या साखळीला पुन्हा एकत्र जोडण्याचा टप्पा आहे. वाघ असल्यावर जंगलातील प्रत्येक प्रजातीला नैसर्गिकरीत्या आपली मर्यादा कळते. त्या त्या प्राण्यांचा वेग, हालचाल आणि जीवनशैली सुधारते आणि त्यामुळे हळूहळू जंगलाची आरोग्यवस्था जोर पकडते. सह्याद्रीचा हा फायदा थेट सातारा, सांगली, कोल्हा-पूर या जिल्ह्यांपर्यंत पोहोचू लागेल. वाघ म्हणजे पर्यटनाचा आत्मा. दशकभरापासून चांदोली राष्ट्रीय उद्यानाच्या नावाला वैभव होते, पण वास्तवाचा त्याला आधार नव्हता. पर्यटकां-ना सफारीची भावना असूनही वाघ दिसत नसल्याने चांदोली आणि कोयना पट्टा पर्यटकांच्या यादीत मागे पडत होता. तारा आल्यावर पर्यटकांचा कल पुन्हा जंगलाकडे वळेल, याचा थेट फायदा स्थानिक होमस्टे, हस्तकला, ग्रामीण पर्यटन मार्गदर्शक आणि खाद्यपदार्थ उत्पादकांना होईल. सह्याद्रीत येणारा प्रत्येक पर्यटक हा स्थानिक अर्थव्यवस्थेच्या चक्राला हातभार लावणारा महत्त्वाचा दुवा आहे. त्यामुळे तेथील गावकऱ्यांना रोजगाराच्या नव्या शक्यता निर्माण होतात. पर्यावरण शिक्षण, ईको-ट्रेल्स, बर्डिंग गाइड्स, स्थानिक स्वयंसहाय्यता गट यांना यामुळे नवे दार उघडते; परंतु 'तारा'ची गोष्ट फक्त पर्यटनाभोवती फिरत नाही. सह्याद्रीत कोयना, वारणा, कृष्णा खोऱ्यांतील जलस्रोत हे या हिरव्यागार कड्यांच्या आरोग्यावर अवलंबून आहेत. जंगल दाट असेल तर पावसाचे पाणी हळूहळू जमिनीत मुरते आणि पुढे नद्यांना नियमित प्रवाह देत राहते. पण गेल्या काही वर्षांत जंगल नष्ट होत गेल्याने पाण्याची अनियमितता वाढली. सांगली, कोल्हापूरसारख्या जिल्ह्यांमध्ये दरवर्षी पूरस्थिती तीव्र होत गेली. वाघ आल्यावर जंगलातील अतिक्रमण आणि बेकायदेशीर चराईवर प्रशासनाची नजर वाढते. वाघ असलेल्या क्षेत्रात लोक जाणीवपूर्वक सावध राहतात जंगलावर अधिक नियंत्रण ठेवले जाते. यामुळे जलस्रोतांचे दीर्घकालीन संरक्षण होते आणि नैसर्गिक नियंत्रण मिळते. हवामान बदलामुळे पावसाची स्वरूपे अधिक आक्रामक होत असताना अशा स्थिर जंगलाची गरज अधिकच वाढली आहे. या प्रकल्पाचा विस्तारित परिणाम कोकण आणि उत्तर कर्नाटकापर्यंतही जाणवेल. सह्याद्री, अंबोली, दांडेली हा नैसर्गिक प्राणी कॉरिडॉर इतिहा-सात जिवंत होता; पण शहरीकरण, रस्ते, खाणी, विद्युत प्रकल्प यांनी त्याच तुकडे-तुकडे केले. 'तारा'सारखे वाघ स्थलांतरित झाल्यावर या कॉरिडॉरकडे पुन्हा एकदा शास्त्रीय दृष्टीने पाहण्याची गरज निर्माण होते. वाघांची ये-जा होत असेल तर हत्ती, गवा, अस्वल, वनकुत्रा यांच्या हालचालीही सुव्यवस्थित राहतात. जैवविविधता फक्त वाघावर अवलंबून नसली तरी वाघ हा त्या विविधतेचा मुख्य सूचक असतो. कोकणातील जंगलांवर खाणकाम किंवा अनियोजित रस्त्यांचे दडपण वाढले की अशा वाघ प्रकल्पांमुळे पर्यावरणीय अनुमतीच्या निकषांत काटेको-रपणा येतो. मात्र या प्रकल्पात धोकेही कमी नाहीत. वाघाला हवा असलेला अखंड जंगल पट्टा आज अनेक भागांत तुटलेला आहे. चांदोली, कोयना, राधानगरीला जोडणारा पट्टा अजूनही अनेक ठिकाणी अरुंद किंवा व्यत्यय आणणारा आहे. गावांची वाढ, व्यावसायिक शेती, जंगल रस्ते या सगळ्यामुळे वाघाला फिरण्यासाठी हवी असलेली शांतता कमी होते.

मानवी-वन्यजीव संघर्षाची शक्यता वाढते. जनावरांवर हल्ले झाले तर स्थानिक लोकांचा विरोध उफाळू शकतो. म्हणूनच जलद आणि सन्मान्य पद्धतीने भरपाई देणारी यंत्रणा, सतत जनजागृती आणि गावकऱ्यांचा थेट सहभाग हे तीन स्तंभ अनिवार्य आहेत, तर दुसरीकडे, सह्याद्रीत शिकार प्राणी पुरेसे नसल्यास वाघ टिकू शकणार नाही. ताडोबात विपुल असलेले सांबर-गवा सह्याद्रीत कमी प्रमाणात दिसतात, त्यामुळे शास्त्रीय पद्धतीने त्यांच्या वाढीकडे लक्ष द्यावे लागेल. या सगळ्यांवर शेवटचा आणि सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे राजकीय इच्छाशक्ती. प्रशासनातील सातत्य नसले तर अशा प्रकल्पाचे भवितव्य धोरण बदलांमध्ये अडकते. तरीही एक गोष्ट निर्विवाद आहे, वाघाचे आगमन म्हणजे निसर्गाचा आत्मविश्वास परत येणे. वाघ असताना जंगलातील वृक्षांचे पुनरुज्जीवन अधिक वेगाने होते, कारण शाकाहारी प्राण्यांचा ताण कमी होतो. दाट जंगलाने कार्बन शोषण वाढते आणि हवामान बदलाचे दडपण कमी करण्याची नैसर्गिक क्षमता वाढते. झरे आणि ओहोळ पुन्हा जिवंत होतात. पक्षी, साप, कासव, कीटक, औषधी वनस्पती यांची संख्या वाढते. हे सर्व मिळून एक मजबूत परिसंस्था तयार करते आणि ही परिसंस्था हवामान बदलाच्या संकटात माणसाला आधार देणारी सर्वात शक्तिशाली ढाल आहे. ऑपरेशन 'तारा' हे म्हणून केवळ एका वाघिणीचे स्थानांतरण नसून संपूर्ण सह्याद्रीचा पुनर्जन्म आहे. दक्षिण महाराष्ट्राच्या पर्यावरणीय आणि आर्थिक भविष्यातील सर्वात महत्त्वाचा टप्पा म्हणजे प्रकल्पाला मिळणारा लोकसह-भाग, वैज्ञानिक व्यवस्थापन आणि राजकीय बांधिलकी. वाघाचे पाऊल सातारा, सांगली, कोल्हापूरच्या मातीत पुन्हा उमटले तर तो निसर्गाचा विजय असेल आणि हवामान बदलाच्या अंधाऱ्या भावी दिवसांना तोंड देण्यासाठी या प्रदेशाला वाघाच्या रूपाने मिळालेला सर्वात मोठा मित्र असेल. फक्त तो मित्र जंगलातच राहिला पाहिजे माणसांच्या घरापर्यंत त्याला येऊ न देणे ही जबाबदारी वन विभागाची!

# अमृत नगर येथील वारंवार वाहणाऱ्या सार्वजनिक शौचालयाच्या घाणीच्या पाण्यामुळे नागरिक त्रस्त ; रोगराई पसरण्याचा धोका

**■ घाटकोपर,(केतन भोज)**



अमृत नगर येथील सीबा सोसायटी समोरील सार्वजनिक शौचालयाच्या ड्रेनेज मधील सर्व घाणीचे पाणी अमृत नगर येथील मुख्य रस्त्यावर वारंवार वाहत येत असल्याने या परिसरात दुर्गंधी पसरली आहे. यामुळे शेकडो नागरिकांचे येथून येजा करणे कठीण झाले आहे.एवढेच नाही तर हे शौचालयाचे घाण पाणी अमृत नगर रस्त्याच्या खालच्या दिशेने एक किमीपर्यंत वाहत येत आहे.शिवाय हे घाण पाणी रस्त्यावर देखील येत आहे.अमृत नगर हा येथील मुख्य स्टॉप असल्याने या ठिकाणांहून अनेक प्रवासी घाटकोपर स्टेशनकडे जाण्यासाठी येथूनच रिक्षा तसेच बस पकडत असतात. त्यासोबतच याचा त्रास वाहन चालकांना देखील सहन करावा लागत आहे.शिवाय शाळकरी लहान मुलांना देखील येथून प्रवास करत असताना घाणीच्या पाण्याचा प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.त्यामुळे नागरिकांना याच घाण पाण्यातून ये-जा करावी लागत आहे.हे दुर्गंधीयुक्त शौचालयाचे घाणीचे पाणी रस्त्यावर सर्वत्र वाहत असल्याने याबाबत स्थानिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.अमृत नगर येथील परिसरात मोठ्या प्रमाणात दुर्गंधी येत असून रोगराई पसरण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.या प्रकरणी या अगोदर देखील प्रहार जनशक्ती पक्षाचे घाटकोपर विधानसभा अध्यक्ष प्रशांत मुके यांनी याबाबत वारंवार मनपा एन विभाग प्रशासनाकडे तक्रार करूनही अद्याप ही डोळ्यावर काळी पट्टी बांधून बसलेल्या संबंधित एन विभाग प्रशासनाने यावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही केली नाही.

वारंवार होणाऱ्या या शौचालयाच्या घाणीच्या पाण्याच्या समस्येबाबत अनेकदा संबंधित मनपा एन विभाग प्रशासनाकडे तक्रार केली होती.या समस्येचा विषय १७ मार्च पासून प्रलंबित आहे,यावर मनपा एन विभाग अधिकारी वर्गाचे संपूर्णतः दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे हे अधिकारी हेतूपुरस्सर यामध्ये हलगर्जीपणा करत असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे.तसेच या प्रभागाचे जबाबदार स्थानिक नगरसेविका यांचे कार्यालय देखील येथे समोरच असून ते जाणीवपूर्वक या समस्येकडे दुर्लक्ष करत डोळेझाक करताना दिसत आहे.त्यामुळे येथील स्थानिक सर्वसामान्य लोकांच्या समस्यांसाठी कोण वाली आहे की नाही ? हा प्रश्न देखील याठिकाणी उद्भवत आहे.

**■ प्रशांत मुके,प्रहार जनशक्ती पक्ष - घाटकोपर विधानसभा अध्यक्ष**






## आमदार राम कदम यांच्या निधीतून तसेच अनिल भाई निर्मळे यांच्या प्रयत्नाने प्रभाग क्रमांक 123 मध्ये पूर्ण करण्यात आलेल्या विविध विकास कामांचे लोकार्पण संपन्न

**■ घाटकोपर,(केतन भोज)**

घाटकोपर पश्चिम विधानसभेचे भाजपाचे आमदार राम कदम यांच्या निधीतून तसेच ईशान्य मुंबई जिल्हा उपाध्यक्ष अनिल भाई निर्मळे यांच्या प्रयत्नाने पूर्ण करण्यात आलेल्या प्रभाग क्रमांक १२३ मधील विविध विकास कामांचे लोकार्पण अनिल भाई निर्मळे यांच्या हस्ते करण्यात आले.

यामध्ये लोकमान्य सोसायटी,शिवगर्जना सोसायटी येथील नवीन बांधण्यात आलेल्या शौचालयाचे काम पूर्ण करण्यात आले.तसेच शिवनेरी चाळ कमिटी येथील सीवरेज लाईनचे काम,श्री गुरुदत सेवा मंडळाच्या शेडचे लोकार्पण तसेच संरक्षक भिंतीचे उद्घाटन देखील करण्यात आले.याशिवाय आकाशगंगा सोसायटी पार्कसाईट येथील सीवरेज लाईनचे काम देखील पूर्ण करण्यात आले.

याबाबत सर्व स्थानिक नागरिकांनी आमदार राम कदम यांच्या निधीतून तसेच ईशान्य मुंबई जिल्हा उपाध्यक्ष अनिल भाई निर्मळे यांच्या प्रयत्नाने प्रभाग क्रमांक १२३ मध्ये पूर्ण करण्यात आलेल्या या सर्व कामांबाबत समाधान व्यक्त केले असून त्यांचे याबाबत आभार मानले आहेत.

यावेळी अनिल भाई निर्मळे यांच्या सोबत या विकास कामांचे लोकार्पण करताना संतोष गांजले- मंडळ अध्यक्ष पार्कसाईट,महेश गुप्ता- वॉर्ड अध्यक्ष तसेच स्थानिक भाजपाचे कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.








# चैत्र पौर्णिमा महोत्सवानिमित्त 22 तास खुलं राहणार तुळजाभवानीचं दर्शन

**■ तुळजापूर वृत्तसंस्था**

तुळजाभवानी देवीच्या मंदिरात यंदा विशेष दर्शन व्यवस्था करण्यात आली असून चैत्र पौर्णिमा महोत्सवानिमित्त तुळजापूर येथील भाविकांची मोठ्या प्रमाणावर होणारी गर्दी लक्षात घेता मंदिर प्रशासनानं महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. महोत्सव काळात मंदिर २२ तास खुलं ठेवण्यात येणार आहे. तसेच भाविकांना सुरळीत व सुलभ दर्शन मिळावं याकरीता उद्यापासून मंदिरात प्रवेशासाठी भक्तांना बीडकर पायऱ्या मार्गाचा वापर करता येणार आहे. श्री तुळजाभवानी मंदिरात दरवर्षीप्रमाणे यंदाही चैत्र पौर्णिमा महोत्सव ३० मार्च २०२६ ते ३ एप्रिल २०२६ या कालावधीत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. महाराष्ट्राची कुलस्वामिनी मानल्या जाणाऱ्या आई तुळजाभवानीच्या दर्शनासाठी यावेळी देशभरातून लाखो भाविक तुळजापूरमध्ये दाखल होत असतात. यंदा सलग सुट्ट्या असल्यानं भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता



असल्यामुळे मंदिर संस्थानकडून विशेष नियोजन करण्यात आलं असनू ३१ मार्च रोजी मध्यरात्री १ वाजल्यापासून ते ५ एप्रिल रोजी रात्री ११ वाजेपर्यंत सर्व भाविकांना बीडकर पायऱ्यांमार्फत मंदिरात प्रवेश देण्यात येणार आहे. या महोत्सवानिमित्त काही महत्त्वाचे बदल करण्यात आले असनू याकाळात व्हीआयपी दर्शन आणि रेफरल दर्शन पास पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहेत. तसेच ३१ मार्च ते २ एप्रिल दरम्यान ५०० रुपयांचा स्पेशल देणगी दर्शन पासही बंद ठेवण्याचा निर्णय मंदिर संस्थाननं घेतला आहे. दरम्यान २०० रुपयांचं सशुल्क देणगी दर्शन पासधारक, अभिषेक पासधारक तसेच धर्म दर्शन आणि मुख दर्शन घेणाऱ्या सर्व भाविकांना बीडकर पायऱ्या मार्गेच दर्शनासाठी प्रवेश दिला जाणार आहे. चैत्र पौर्णिमा महोत्सव भक्तांसाठी अत्यंत श्रद्धेचा आणि उत्साहाचा सोहळा मानला जातो. त्यामुळे या उत्सवा दरम्यान भाविकांना तूळजाभवानी देवीचं योग्य दर्शन घेता यावं याकरिता विशेष दर्शन व्यवस्था करण्यात आली आहे.

# 21 प्रवर्गातील दिव्यांगांना शासन योजनांचा लाभ

**■ मुंबई वृत्तसंस्था**

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016 अंतर्गत निर्धारित करण्यात आलेल्या सर्व 21 प्रवर्गातील दिव्यांग व्यक्तींना राज्य शासन तसेच तत्सम यंत्रणांच्या विविध योजना, सवलती, लाभ, अनुदान व इतर सुविधांसाठी पात्र ठरविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हा निर्णय दिव्यांग व्यक्तींच्या सर्वसमावेशक सक्षमीकरणाच्या दिशेने महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार असून, राज्यातील अधिकाधिक दिव्यांग नागरिकांना शासनाच्या योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळण्यास मोठी चालना मिळणार आहे, अशी माहिती दिव्यांग सक्षमीकरण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी दिली.

सचिव तुकाराम मुंढे म्हणाले, या निर्णयामुळे यापूर्वी 1995 च्या अधिनियमानुसार केवळ 7 प्रवर्गापुरते मर्यादित असलेले लाभ आता विस्तारून सर्व 21 प्रकारच्या दिव्यांग व्यक्तींना उपलब्ध होणार आहेत. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, 2026 लागू झाल्यानंतरही काही शासकीय कार्यालयांमध्ये जुन्या निकषांनुसारच लाभ दिला जात असल्याचे आढळून आले होते. त्यामुळे नव्याने समाविष्ट प्रवर्गातील दिव्यांगांना योजनांचा लाभ मिळण्यात अडचणी येत होत्या. या पार्श्वभूमीवर शासनाने स्पष्ट, एकसंघ व सर्वसमावेशक धोरण निश्चित करत हा निर्णय घेतला आहे.

या निर्णयानुसार अस्थिव्यंग, कुष्ठरोगमुक्त, मेंदूचा पक्षाघात, शारीरिक वाढ खुंटणे, स्नायूंची विकृती, आम्ल हल्ला पिडीत, पुर्णतः अंधत्व, अंशतः अंध, कर्णबधिरता, वाचा/भाषा दोष, बौद्धिक अक्षम, विशिष्ट अध्ययन अक्षम, स्वमग्नता (Autism), मानसिक आजार, मल्टिपल स्क्लेरोसिस, पार्किन्सन, हिमोफिलिया, थॅलेसेमिया, सिकल सेल, मज्जासंस्थेचे तीव्र आजार आणि बहुविकलांग अशा सर्व 21 प्रवर्गांचा समावेश करण्यात आला आहे. हा लाभ घेण्यासाठी संबंधित व्यक्तीकडे किमान 40 टक्के किंवा त्यापेक्षा अधिक दिव्यांगत्व असल्याचे सक्षम प्राधिकरणाने प्रमाणित केलेले वैध वैश्विक दिव्यांग ओळखपत्र (UDID) असणे आवश्यक आहे. तसेच कायमस्वरूपी दिव्यांगत्व प्रमाणपत्रधारकांनाच योजनांचा लाभ मिळणार असून, तात्पुरत्या प्रमाणपत्रधारकांना लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

या निर्णयामुळे दिव्यांग व्यक्तींना गृहनिर्माण योजना, विविध शिष्यवृत्ती योजना, दिव्यांग विवाह योजना, गुणवत्ता पुरस्कार, प्रशिक्षित दिव्यांग व्यक्तीना स्वयंरोजगारासाठी आर्थिक सहाय्य, दिव्यांग व्यक्तींना साधने व उपकरणांसाठी आर्थिक सहाय्य, राज्य पुरस्कार योजना, बीज भांडवल योजना तसेच इतर विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळणार आहे.


हा निर्णय सर्व मंत्रालयीन विभाग, त्यांच्या नियंत्रणाखालील कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था, महामंडळे व अनुदानित संस्थांना लागू राहणार असून संबंधित विभागांनी आवश्यकतेनुसार नवीन योजना आखून स्वतंत्र शासन निर्णय जारी करावेत, असे निर्देश देण्यात आले आहेत.

हा निर्णय दिव्यांग व्यक्तींच्या सर्वसमावेशक विकासासाठी आणि त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. याबाबतचा शासन निर्णय दिव्यांग सक्षमीकरण विभागाने निर्गमित केला असून महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# भगवान महावीर जयंती उत्साहात साजरी होणार

## सकल जैन समाजातर्फे विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन



**प्रतिनिधी । बीड**

**जैन धर्माचे 24 वे तीर्थंकर भगवान महावीर यांच्या जन्म कल्याणकानिमित्त 31 मार्च 2026 रोजी देशभरासह बीड येथे सकल जैन समाजतर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यादिवशी सकाळी 7 वाजता जैन भवन येथून अहिंसा रॅलीला प्रारंभ होणार आहे. रॅलीमध्ये भगवान महावीरांची प्रतिमा विराजमान असलेला रथ अग्रभागी राहणार आहे.**

**पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत यांच्या हस्ते रॅलीचा शुभारंभ होईल. ही रॅली डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा पेठ, खडकपुरा, जुना बाजार, बलभीम चौक, कारंजा, नवी भाजी मंडई, सुभाष रोड मार्गे सकाळी 9 वाजता जैन भवन येथे पोहोचेल. त्यानंतर रॅलीचे रूपांतर धर्मसभेत होणार आहे. रॅलीदरम्यान दिगंबर जैन मंदिर, जुना बाजार येथे '1008 प्रयोग त्रिलोक्य चूडामणी वासुदेव भगवान' यांच्या प्रतिमेचा अभिषेक करण्यात येणार आहे. त्यानंतर सकाळी 9 ते 11.30 या वेळेत जैन भवन येथे विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला जैन साध्वी सेजल श्रीजी व बीजल श्रीजी यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. जिल्हा कारागृह अधीक्षक रामराजे चांदणे हेही उपस्थित राहणार आहेत. यावेळी भगवान महावीरांच्या जीवन चरित्रावर प्रवचन होणार आहे. तसेच नवकार सोशल ग्रुपतर्फे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. डॉ.मयन बियाणी यांच्या वतीने मोफत दंतचिकित्सा शिबिर, तर डॉ.आदेश्वर लुनावत यांच्या वतीने फिजिओथेरपी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. तयानंतर उपस्थितांसाठी मोजकर परिवाराच्यावतीने गौतम प्रसादीचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमानंतर प्रविणकुमार हर्षकुमार बोरा व पारसमल अभयकुमार छाजेड परिवारातर्फे प्रभावना ठेवण्यात आली आहे. या सर्व कार्यक्रमांना सहपरिवार उपस्थित राहावे, असे आवाहन महावीर जन्म कल्याणक समितीचे प्रोजेक्ट चेअरमन अतुल मौजकर व सर्व संप्रदायांच्या प्रमुखांनी केले आहे.**

पान १ वरुन

# कडा येथे 'पंडित दीनदयाळ उपाध्याय' महाभियान 2026' शिबिराचा उत्साहात शुभारंभ

संघटन अधिक बळकट करणे आणि पक्षाच्या धोरणांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक दिशा देणे हा आहे. दिवसभर विविध सत्रांद्वारे कार्यकर्त्यांना समाजजागृती, वैचारिक अधिष्ठान, भारतीय जनता पक्षाची कार्यपद्धती, पक्षाचा इतिहास, कार्यविस्तार, तसेच केंद्र व राज्य सरकारच्या विकासकामांची माहिती देण्यात आली. राष्ट्रभक्ती, सामाजिक बांधिलकी आणि संघटनात्मक कार्याचे महत्त्व यावरही सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी महामंडलेश्वर स्वामी त्रिविक्रमानंद शास्त्री यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व भारतीय जनता पक्षाच्या विचारधारेवर भाष्य करत कार्यकर्त्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. जनसंघापासून सुरू झालेल्या विचारप्रवाहाने आज वटवृक्षाचे रूप घेतले असून समाजाला एकत्रित ठेवणे, राष्ट्रहित जागृत ठेवणे आणि योग्य दिशा देणे हे या विचारधारेचे वैशिष्ट्य असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. केवळ दोन खासदारांपासून सुरू झालेला पक्ष आज देशातील क्रमांक एकचा पक्ष बनला असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने सर्वच क्षेत्रांत भक्कम स्थान निर्माण केले असल्याचे त्यांनी सांगितले.

यानंतर दयावान मुंडे यांनी पक्षाच्या संघटनात्मक रचनेवर व कार्यपद्धतीवर सविस्तर मार्गदर्शन करत कार्यकर्त्यांनी गावपातळीवर अधिक सक्रिय राहून जनसंपर्क वाढवावा, तसेच पक्षाची विचारधारा प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवावी, असे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲड. साहेबराव म्हस्के होते. यावेळी आमदार सुरेश धस, आदिनाथ सानप, आष्टी मंडळाध्यक्ष रमेश गावडे, कडा मंडळाध्यक्ष अनिल ढोबळे यांच्यासह विविध पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून कार्यकर्त्यांना प्रेरणा दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आष्टी विधानसभा प्रमुख गणेश शिंदे यांनी प्रभावीपणे केले, तर पहिल्या सत्राचे आभार अनिल ढोबळे यांनी मानले. संपूर्ण शिबिरात कार्यकर्त्यांचा उत्साह, शिस्तबद्धता आणि संघटनाबद्दलची निष्ठा प्रकर्षाने जाणवली. या प्रशिक्षणामुळे कार्यकर्त्यांना नवचैतन्य व स्पष्ट दिशा मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे.

दरम्यान, या महाभियान शिबिराचा समारोप आज होणार असून भाजप प्रवक्ते तथा नगरसेवक नवनाथ बन यांच्या मार्गदर्शनाखाली समारोप सत्र पार पडणार आहे. या सत्रातही कार्यकर्त्यांना महत्त्वपूर्ण मार्गदर्शन मिळणार असल्याने सर्वांचे लक्ष समारोपाकडे लागले आहे.

# शिक्षकांच्या विविध प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी कटिबद्ध राहणार : सौ.संगीता पाटील

## नूतन जिल्हा परिषद अध्यक्षांचा शिक्षक संघ थोरात गटाच्या वतीने सत्कार



जिल्हा परिषदेमध्ये शिक्षकांचे विविध प्रश्न सोडवण्यासाठी शिक्षक संघटनांना विश्वासात घेतले जाईल. या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी आपण सदैव कटीबद्ध राहणार असून संपूर्ण सांगली जिल्ह्यात प्राथमिक शिक्षणाची गुणवत्ता वाढवण्यासाठी शिक्षक आणि प्रशासनाच्या समन्वयातून व्यापक प्रयत्न केले जातील, असे प्रतिपादन सांगली जिल्हा परिषदेच्या नूतन अध्यक्षा सौ. संगीता पाटील यांनी केले.

सांगली येथे शिक्षक संघ थोरात गटाच्या जिल्हा कार्यकारणीच्या वतीने त्यांचा शाल, बुके आणि फेटा देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष विनायकराव शिंदे होते. यावेळी संपूर्ण सांगली जिल्ह्यातून शिक्षक संघ थोरात गटाचे शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी त्या पुढे म्हणाल्या, आमदार जयंत पाटील यांनी मॉडेल स्कूल ही संकल्पना सांगली जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या शाळांसाठी राबवली. यामुळे जिल्ह्यातील शाळांचा चेहरा मोहरा बदलला. समाजाचा ओढा पुन्हा प्राथमिक शाळांकडे वाढू लागला आहे. राज्य शासनाने सांगली जिल्ह्यातील हा उल्लेखनीय उपक्रम स्वीकारला असून संपूर्ण राज्यात त्याची अंमलबजावणी होणार आहे. आपणही पुन्हा मॉडेल स्कूलच्या माध्यमातून शाळांच्या सर्वांगीण विकासाला गती देणार आहोत. आपण सर्वांनी या उपक्रमांना साथ द्यावी, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

यावेळी विनायकराव शिंदे म्हणाले, पुढील काळात जिल्ह्यातील शिक्षकांचे विविध प्रश्न शिक्षक संघाच्या माध्यमातून आपणापुढे सातत्याने मांडले जातील. हे प्रश्न आपण सकारात्मक दृष्टिकोनातून सोडविण्यासाठी सहकार्य करावे. राज्याचे शिक्षक नेते संभाजीराव थोरात आणि राज्याध्यक्ष बाळासाहेब मारणे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असणारा शिक्षक संघ ही राज्यातील बलाढ्य शिक्षक संघटना आहे. राज्यातील शिक्षकांचे प्रश्न सोडवण्यासाठी सातत्याने संघर्ष करणारी ही प्रभावी संघटना आहे.

यावेळी नेर्लेचे माजी सरपंच संभाजीराव पाटील, शिक्षक बँकेचे व्हॉइस चेअरमन फत्तु नदाफ, माजी चेअरमन संतोष जगताप, संचालक धनाजी घाडगे, गांधी चौगुले, अजित पाटील, संजय काटे, महादेव हेगडे, अरुण पाटील, श्रीकांत पवार, श्यामगोंडा पाटील, अशोक पाटील, उत्तम पाटील, महादेव पवार प्रमुख उपस्थित होते. स्वागत नंदकुमार खराडे यांनी केले.आभार सुधाकर पाटील यांनी मानले.

यावेळी शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन साहेबलाल तांबोळी, दीपक रोकडे, मोहन पवार, अजिनाथ बुधावले, रणजीत नाटेकर, समाधान ऐवळे, आसिफ मुजावर, संजय सावंत, उमेश माने, सचिन पाटील, राजाराम कदम, तानाजी कोडग, आप्पासो जाधव, अधिक काटे, मासिद्धा पुजारी, रमण खबाले, विकास निंबाळकर, अर्जुन कदम, चंद्रकांत पाटील, धनाजी पाटील, विकास वायदंडे, हनुमंत गायकवाड, राजेश निकम, धनाजी साळुंखे, शिवरुद्र वठारे, सिकंदर शेख, सुधीर नलवडे, दिलीप पवार, विशाल मोरे, ब्रिजेश पाटील, अनिल रोकडे, रामचंद्र मदने आणि शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गुरुद्वारा बसमत नगर दमदमा साहिब परिसरातील तलावाच्या दूषित पाण्यामुळे भाविकांचे आरोग्य धोक्यात

## 'हजुरी पाठी संघटने'चे प्रशासनाला साकडे

**बसमत (प्रतिनिधी)**

येथील ऐतिहासिक आणि लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या गुरुद्वारा दमदमा साहिब परिसरातील तलावाच्या दुरवस्थेकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असून, या गंभीर समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी हजुरी पाठी संघटनेने आता पुढाकार घेतला आहे. यासंदर्भात आमदार चंद्रकांत नवघरे यांना नुकतेच निवेदन देऊन तातडीने उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे.

■ **नेमकी समस्या काय?**

बसमत येथील ऐतिहासिक गुरुद्वारा दमदमा साहिब येथे दररोज देश-विदेशातून हजारो भाविक दर्शनासाठी येतात. या गुरुद्वाराच्या शेजारीच एक जुना तलाव आहे. सध्या या तलावाचे काम प्रशासनामार्फत सुरू आहे; परंतु संतापजनक बाब अशी की, गुरुद्वाराच्या बाजूने असलेल्या नाल्याचे सांडपाणी थेट या तलावात मिसळत आहे. यामुळे तलावात मोठ्या प्रमाणावर घाण साचली असून परिसरात दुर्गंधी पसरली आहे.



■ **प्रशासकीय उदासीनता:**

यापूर्वीही संघटनेच्या वतीने हिंगोली जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी (बसमत), नगरपरिषद अध्यक्ष आणि तहसीलदार यांना पत्रव्यवहार करून या समस्येची जाणीव करून देण्यात आली होती. मात्र, अद्यापपर्यंत प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. प्रशासनाच्या या अनदेखीमुळे दर्शनासाठी येणाऱ्या यात्रेकरूंना आणि स्थानिक नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

■ **पुढील पाऊल:**

गुरुद्वारा परिसरातील पवित्रता जपण्यासाठी आणि भाविकांच्या आरोग्याचा विचार करून या तलावाच्या कामात योग्य सुधारणा करावी आणि नाल्याचे पाणी तलावात जाण्यापासून थांबवावे, अशी आग्रही विनंती हजुरी पाठी संघटनेने केली आहे. या निवेदनावर अध्यक्ष स. दलजितसिंग बिशनसिंग हजुरी पाठी, उपाध्यक्ष स. प्रदिपसिंग जितसिंग रागी आणि सचिव स. जगदिपसिंग मोहनसिंग नंबरदार स,हुकम सिंघ कराबिन, महिनदर सिंघ पैदल हरनामसिंग चव्हाण यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# वसंतराव नाईक महाविद्यालयात पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहात व भावनिक वातावरणात संपन्न



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**

येथील श्री. शिवदास शिक्षण प्रसारक मंडळ संचलित वसंतराव नाईक महाविद्यालय वसरणी नांदेड येथे बी.ए. बी.कॉम बी.एस.सी तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांचा व एम.ए. इतिहास द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ मोठ्या उत्साहात आणि भावनिक वातावरणात संपन्न झाला. सदरील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शेखर घुंगरवार हे होते तर व्यासपीठावर प्रो. डॉ. रेणुका मोरे, प्रो. डॉ. नागेश कांबळे, डॉ. शेट्टे एस. व्ही. डॉ. आर. एम. कांगणे, डॉ. व्ही. एम. देशमुख, डॉ. अनिल गच्चे, डॉ. सुनीता गरुड डॉ. गणेश लिंगमपल्ले,डॉ. साहेबराव शिंदे, यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते हरितक्रांतीचे प्रणेते स्व.वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पुष्प पूजन व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी बी.ए.बी. कॉम. बी.एस.सी प्रथम व द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांनी बी.ए.बी.कॉम. बी.एस.सी तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ व भेट देऊन सत्कार केला. यावेळी निरोप घेणाऱ्या कु. श्रेया कंधारे, सुहानी पवार, वैष्णवी दुधमल, प्रथमेश, शेख मोहसीन या विद्यार्थ्यांनी या महाविद्यालयात शिक्षण घेतानाच्या आठवणींना उजाळा देत आपले अनुभव कथन करून प्राध्यापका विषयी कृतज्ञता व्यक्त करून मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रो. डॉ. नागेश कांबळे यांनी केले व या कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोप प्रसंगी मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. शेखर घुंगरवार म्हणाले की विद्यार्थ्यांनी या पुढे देखील खूप मोठ्या प्रमाणात उच्च शिक्षण घेऊन आपलं स्वतःचं व महाविद्यालयाचे नाव उज्वल करावं व पुढील येणाऱ्या प्रत्येक क्षेत्रात गरुड झेप घेण्याचा प्रयत्न करावा असे आवाहन करून त्यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी प्रो. डॉ. रेणुका मोरे, डॉ. एस.व्ही.शेट्टे, डॉ. आर. एम. कांगणे, यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर असे मार्गदर्शन करून पुढील शैक्षणिक कारकिर्दीस शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शशिकांत हटकर यांनी केले. तर आभार प्रदर्शन डॉ. ललिता अय्या यांनी मानले

या कार्यक्रमाला डॉ. दिलीप पालीमकर, डॉ. साहेबराव मोरे, डॉ. यु.एस.कानवटे,डॉ. विजय मोरे, डॉ. संतोष शिंदे,प्रा. कविता हंबर्डे, प्रा. किशोर सूर्यवाड, से. नि. कार्यालयीन अधीक्षक आर.डी. राठोड

डॉ.श्रीराम अय्यर, डॉ. एल व्ही. खरात, प्रा. सुरेश तिवारी,प्रा. नितीन मुंडलोड, प्रा. कपिल हिंगोले, प्रा. प्रबुद्ध चित्ते, प्रा. डॉ.समाधान दराडे, डॉ. माधव पुयड, प्रा. मिर्झा जुनैद, यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद शिक्षकेतर कर्मचारी व असंख्य विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. सदरील कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

# शिवसेना उपनगराध्यक्ष,माजी नगराध्यक्षा व नगरसेवक यांच्या पाठपुराव्याला यश

## (महागाव शहरातील दलीत वस्ती सह विविध विकास कामांसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी मंजुर)

■ **महागाव प्रतिनिधी**

शहरातील दलित वस्तीसह जलशुद्धीकरण केंद्रांची संरक्षक भिंत,समाज कल्याण शाळेचा रस्ता यांसह विविध विकास कामांसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी राज्यशासनाच्या वतीने मंजुर करण्यात आला असुन याकरिता विद्यमान उपनगराध्यक्ष प्रमोद भरवाडे,माजी नगराध्यक्षा सौ. करूणा नारायण शिरबिरे व नगरसेवक सुजितसिंह ठाकुर यांनी केलेल्या पाठ पुराव्याला यश आल्याने शहरवासीयांनी समाधान व्यक्त केले आहे.

महागाव न. प. मध्ये सत्ता परिवर्तन झाल्यानंतर विकास कामाचा सपाटा सुरू असुन शहरातील दलित वस्ती, समाज कल्याण शाळेकडे जाणारा रस्ता ,घनकचरा व्यवस्थापन ,जलशुद्धीकरण केंद्राला संरक्षक भिंत यांसह विविध विकास कामांसाठी निधी उपलब्ध व्हावा याकरिता शिवसेना (उबाठा)चे उपनगराध्यक्ष प्रमोद भरवाडे,माजी नगराध्यक्षा सौ. करूणा नारायण शिरबिरे व स्वीकृत नगरसेवक सुजितसिंह ठाकुर यांनी मागील तीन वर्षांपासून निवेदनाद्वारे राज्य शासनाकडे पाठपुरावा केला परंतु याठिकाणी असलेल्या महाविकास आघाडीच्या सत्तेमुळे त्याला अनेक अडचणी येत होत्या.परंतु नुकताच याठिकाणी भाजपचा नगराध्यक्ष विराजमान झाला असुन भाजपचा नगराध्यक्ष विराजमान होण्यासाठी मदत करणाऱ्या उपनगराध्यक्ष प्रमोद भरवाडे,माजी नगराध्यक्षा सौ. करुणा शिरबिरे व नगरसेवक सुजितसिंह ठाकुर यांच्या मागणीची दखल घेवुन आमदार किसनराव वानखेडे व भाजप जिल्हा समन्वयक नितीन भुतडा यांनी याबाबत शासनाकडे निधी मंजुर करण्याची मागणी केली. त्यानुसार महागाव शहरात अण्णाभाऊ साठे दलीत वस्ती योजनेअंतर्गत २कोटी७०लाख रुपयांचा निधी मंजुर करण्यात आला असुन त्यामध्ये प्रभाग क्रमांक १०मध्ये१कोटी ४९लाख, प्रभाग क्रमांक ६ मध्ये९१लाख,प्रभाग क्रमांक १७ मध्ये ३०लाख रुपयांची विकास कामे करण्यात येणार आहेत.त्याच प्रमाणे शहरातील विविध विकास कामांसाठी ७कोटी रुपयांचा निधी मंजुर करण्यात आला असुन त्यामध्ये स्वच्छ भारत अभियान अंतर्गत घनकचरा व्यवस्थापनासाठी १कोटी२६लक्ष रुपये यांसह प्रभाग क्रमांक १०मधील जलशुद्धीकरण केंद्राची संरक्षण भिंत ४०लक्ष,फुलसावंगी रस्त्यावरील शासकीय विश्रामगृहासमोरून समाज कल्याण शाळा व त्याच परिसरात असलेल्या विविध शाळांकडे जाणारा रस्ता निर्माण करण्यात येणार आहे. उपनगराध्यक्ष प्रमोद भरवाडे,माजी नगराध्यक्षा सौ.करूणा नारायण शिरबिरे व नगरसेवक सुजितसिंह ठाकुर यांनी केल्या पाठपुराव्यामुळेच महागाव न. पं. एकाच वेळी एवढा मोठा निधी मंजुर झाल्याने शहर वासियांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे.





## महावीर जयंतीनिमित्त आष्टीत कत्तलखाने व मांसविक्री दुकाने बंद ठेवण्याचा निर्णय : नगराध्यक्ष जिया बेग

■ **आष्टी (प्रतिनिधी)**

आष्टी शहरात जैन धर्मातील २४ वे तीर्थंकर भगवान महावीर यांच्या जयंतीनिमित्त मंगळवार, दि.३१ मार्च रोजी विविध धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, संपूर्ण शहरात ही जयंती मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने साजरी करण्याची तयारी सुरू आहे.

महावीर जयंती हा जैन समाजासाठी अत्यंत पवित्र आणि महत्त्वाचा दिवस मानला जातो. भगवान महावीर यांनी दिलेला अहिंसा, सत्य, करुणा आणि सर्व जीवांप्रती दया या मूल्यांचा संदेश लक्षात घेता, या दिवशी शहरात कोणत्याही प्रकारची जीवहानी होऊ नये, यासाठी आष्टी नगरपंचायतीने विशेष निर्णय घेतला आहे.

नगराध्यक्ष जिया बेग यांनी दिलेल्या माहितीनुसार, मंगळवार, दि. ३१ मार्च रोजी महावीर जयंतीनिमित्त आष्टी शहरातील सर्व



कत्तलखाने तसेच मटण, चिकन आणि मासे विक्री करणारी दुकाने दिवसभर पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहेत. या निर्णयामागे धार्मिक भावना जपणे, तसेच शहरात शांतता व सौहार्दाचे वातावरण कायम ठेवणे हा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

याशिवाय, महावीर जयंतीनिमित्त शहरात प्रभात फेरी, धार्मिक मिरवणुका, प्रवचने आणि विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. त्यामुळे शहरात दिवसभर उत्सवी वातावरण राहणार आहे. प्रशासनाच्या या निर्णयामुळे जयंतीचे पावित्र्य अधिक वृद्धिंगत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या आदेशाचे सर्व संबंधित मांस विक्रेते, कत्तलखाना चालक तसेच नागरिकांनी सहकार्य करून काटेकोर पालन करावे, असे आवाहन नगराध्यक्ष जिया बेग यांनी केले आहे. महावीर जयंतीच्या निमित्ताने संपूर्ण शहरात स्वच्छता, शांतता आणि धार्मिक एकात्मतेचे वातावरण निर्माण व्हावे, यासाठी आष्टी नगरपंचायतीकडून सर्वतोपरी प्रयत्न केले जात असल्याचेही नगराध्यक्ष जिया बेग नमूद केले.

## परळीत सोमवारी मांस विक्री बंदीची मागणी ; केदारी यांचे प्रशासनाला निवेदन

■ **परळी (वार्ताहर)**

बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ येथे प्रत्येक सोमवारी मांस विक्री व सेवनावर कडक बंदी लागू करण्यात यावी, या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते श्री. शिवकुमार केदारी (हिंद नगर, परळी वैजनाथ) यांनी प्रशासनाकडे सविस्तर निवेदन सादर केले आहे. परळी वैजनाथ हे भारतातील १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक पवित्र धार्मिक स्थळ असून, येथे दर सोमवारी हजारो भाविक प्रभू वैद्यनाथ भगवान यांच्या दर्शनासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहतात. त्यामुळे त्या दिवशी शहरात भक्तिमय, सात्विक व धार्मिक वातावरण निर्माण होत असते. मात्र, अशा पवित्र दिवशीही शहरात मांस विक्री सुरू असल्याने भाविकांच्या धार्मिक भावना दुखावल्या जात असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

याबाबत श्री. केदारी यांनी प्रत्यक्ष नगर परिषद परळी वैजनाथ कार्यालयात जाऊन निवेदन सादर केले असून, तसेच जिल्हा प्रशासन व राज्यातील



मान्यवरांना ईमेलद्वारे निवेदन पाठवून तातडीने निर्णय घेण्याची मागणी केली आहे.

सदर निवेदनाची प्रत मा. जिल्हाधिकारी, बीड, मा. उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार, मा. पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे तसेच मा. आमदार धनंजय मुंडे यांना पाठविण्यात आली आहे.

निवेदनात पुढे नमूद करण्यात आले आहे की, सोमवार हा भगवान शंकराचा पवित्र दिवस असून त्या दिवशी भाविक उपवास, पूजन व धार्मिक आचरण करतात. अशा वेळी मांस विक्री सुरू राहणे ही बाब जनभावनेला ठेच पोहोचवणारी असून परळी वैजनाथच्या पवित्रतेला बाधा आणणारी आहे.

या पार्श्वभूमीवर श्री. केदारी यांनी प्रशासनाकडे प्रत्येक सोमवारी मांस विक्री, कत्तल, वाहतूक व सेवनावर पूर्ण बंदी लागू करावी, नगर परिषदेमार्फत याबाबत अधिकृत ठराव मंजूर करावा तसेच आदेशाची कडक अंमलबजावणी करून उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. दरम्यान, नगर परिषद स्तरावर हा विषय पुढील सभेत मांडण्यात येणार असल्याचे समजते. त्यामुळे या मागणीबाबत प्रशासन कोणता निर्णय घेते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## लोकार्थ

### थायलंडच्या फुकेतमध्ये पर्यटनासोबत रिअल इस्टेट गुंतवणुकीची नवी दिशा!

हिंद महासागराच्या निळ्याशार किनाऱ्यांनी नटलेले, डोंगररांगा, समुद्रकिनारे आणि समृद्ध सांस्कृतिक वारसा लाभलेले थायलंडमधील फुकेत हे जगातील सर्वात आकर्षक पर्यटनस्थळांपैकी एक मानले जाते. अशा या निसर्गसंपन्न आणि सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध फुकेतमध्ये पुण्यातील प्रसिद्ध श्रीमंत दगडूशेट हलवाई गणपती मंदिराची हुबेहूब प्रतिकृती उभारण्यात आली असून, मराठी संस्कृतीचा जागतिक स्तरावर विस्तार करण्याचा एक अनोखा उपक्रम साकार झाला आहे.

दुबईस्थित उद्योगपती आणि गल्फ महाराष्ट्र बिझनेस फोरमचे ग्लोबल अध्यक्ष डॉ. सुनील व्ही. मांजरेकर यांच्या पुढाकारातून भारतीय विशेषतः महाराष्ट्रीयन नागरिकांसाठी फुकेतमध्ये घर खरेदीची सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे. त्यांच्या SQCC प्रोपेर्तीज LLC (Dubai, UAE) आणि फुकेत ३ रिअल इस्टेट डेवलपमेंट (Thailand) यांच्या संयुक्त विद्यमाने अत्याधुनिक सोयीसुविधांनी युक्त निवासी आणि व्यावसायिक प्रकल्प उभारले जात आहेत.फुकेत ९ ही कंपनी 2004 पासून फुकेतमध्ये रिअल इस्टेट क्षेत्रात कार्यरत असून, विकास, बांधकाम आणि व्यवस्थापन या सर्व क्षेत्रांत विश्वासार्ह नाव म्हणून ओळखली जाते. कंपनीच्या पोर्टफोलिओमध्ये हॉटेल्स, कॉन्डोमिनियम्स आणि लक्झरी व्हिला यांचा समावेश असून सर्व प्रकल्पांसाठी व्यावसायिक प्रॉपर्टी मॅनेजमेंट सुविधा दिल्या जातात.मुंबईतील एका कार्यक्रमात फुकेत ९च्या संस्थापक मिस पापाचसॉर्न मीपा यांच्या उपस्थितीत या प्रकल्पाची घोषणा करण्यात आली. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष रवींद्र माणगावे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.




### फिक्कीचा मिडिया इकॉनॉमी २०२६ अहवाल सादर

फिक्की आणि ईवाय इंडिया यांनी प्रसिद्ध केलेल्या 'स्टोरीज, स्केल अँड इम्पॅक्ट: अनलॉकिंग इंडियाज मीडिया अँड एंटरटेनमेंट इकॉनॉमी' या अहवालानुसार, भारताच्या मीडिया आणि मनोरंजन क्षेत्राने २०२५ मध्ये आपला विस्तार सुरू ठेवला असून, ते वार्षिक ९% वाढीसह २.७८ ट्रिलियन भारतीय रुपयांवर पोहोचले आहे. काही निवडक क्षेत्रांना नियामक आणि खर्चाच्या दबावाचा सामना करावा लागला असला तरी, ही वाढ प्रामुख्याने डिजिटल मीडिया, जाहिरात आणि थेट अनुभवांमुळे झाली.फिक्की-ईवाय अहवालानुसार, २०२५ मध्ये डिजिटल मीडिया हे मीडिया आणि मनोरंजन उद्योगातील सर्वात मोठे क्षेत्र म्हणून उदयास आले असून, त्याने प्रथमच १ ट्रिलियन भारतीय रुपयांचा टप्पा ओलांडला आहे. डिजिटल जाहिरातींमध्ये २६% वाढ नोंदवली गेली, ज्यामुळे एकूण जाहिरात महसुलात जवळपास दोन-तृतीयांश वाटा या क्षेत्राचा आहे. कारण ब्रँड्सनी आपला खर्च कामगिरी-आधारित, मोजता येण्याजोग्या आणि वाणिज्य-संबंधित स्वरूपांकडे वळवला आहे. मोठ्या स्क्रीनवरील वापरामध्ये लक्षणीय वाढ झाल्यामुळे हे क्षेत्र सतत विकसित होत आहे. फिक्की-ईवाय अहवालानुसार, २०२५ मध्ये जाहिरात क्षेत्रात एकूण १३.५% वाढ झाली,



### गार्निअर कलर नॅचरल्सचे नवीन "ट्रस्ट कॅम्पेन"

गार्नियर कलर नेचरल्सने अभिनेत्री रवीना टंडनसोबतचा आपला संबंध अधिक मजबूत केला असून आता त्यांच्या मुली राशा थडानीला नवीन कॅम्पेनमध्ये सादर केले आहे. या कॅम्पेनमध्ये खरी आई–मुलीची जोडी दाखवली आहे जी ब्रँडचा मुख्य स्तंभ विश्वास अधोरेखित करते आणि घरबसल्या सहज हेअर कलरिंगचा उत्सव साजरा करते. हे ब्रँडसाठी नैसर्गिक पुढचे पाऊल आहे, ज्यात गार्नियर कलर नेचरल्सची विश्वासार्ह, नैसर्गिक दिसणाऱ्या हेअर कलरची परंपरा रवीना यांच्या पिढ्यानपिढ्या पोहोचणाऱ्या आकर्षणासोबत आणि राशाच्या नव्या पिढीच्या ताजेपणा व जोडणीसोबत एकत्र केली आहे. एक आयकॉनिक स्टार म्हणून रवीना, आपल्या मुलीसोबत या कॅम्पेनमध्ये सहज उबदारपणा आणि खरी भावना आणतात. नवीन "ट्रस्ट कॅम्पेन"सोबत गार्नियर कलर नेचरल्स घरबसल्या हेअर कलरिंगमध्ये आपले नेतृत्व अधिक मजबूत करतो, विश्वासाला सर्वात शक्तिशाली प्रेरक मानून. हा कॅम्पेन रवीना टंडन आणि राशा थडानीसोबत अशी कथा सादर करतो जी दाखवते की स्त्रिया कशा शोधतात, निवडतात आणि त्यावर टिकून राहतात

### नायरा एनर्जीचे पेट्रोल महागले

देशातील सर्वांत मोठ्या खासगी इंधन किरकोळ विक्रेत्या कंपनीने गुरुवारी पेट्रोलच्या दरात प्रतिलीटर ५ रुपये आणि डिझेलच्या दरात प्रतिलीटर ३ रुपयांनी वाढ केली आहे. मध्य पूर्वेतील युद्धामुळे खनिज तेलाच्या दरात झालेल्या वाढीचा काही भार ग्राहकांवर टाकण्याचा निर्णय कंपनीने घेतला असल्याचे सूत्रांनी सांगितले.२८ फेब्रुवारी रोजी अमेरिका आणि इस्रायलने इराणवर लष्करी हल्ले केल्यानंतर खनिज तेलाच्या दरात सुमारे ५० टक्क्यांनी वाढ झाली आहे. तरीही भारतात पेट्रोल आणि डिझेलचे किरकोळ दर स्थिर असल्याने तेल विपणन कंपन्या दबावाखाली होत्या.भारतातील १,०२,०७५ पेट्रोल पंपांपैकी ६,९६७ पंप चालवणाऱ्या नायरा एनर्जीने खर्चातील वाढीचा काही वाटा ग्राहकांकडून वसूल करण्याचा निर्णय घेतला आहे.

■ **संकलन –संयोजन सुबोध रणशेवरे**






## श्री वैद्यनाथ मंदिरात शंभू महादेवाच्या वाघाच्या काठीचे उत्साहात स्वागत; देशमुख परिवाराकडून पारंपरिक आरती

■ **परळी : प्रतिनिधी**

येथील देशमुख पारावरील देशमुख यांच्या गढीवरील वाड्यात पारंपरिक आरती पूजन करून श्री वैद्यनाथ मंदिरात शंभू महादेवाच्या वाघाच्या काठीचे श्री वैद्यनाथ देवस्थान ट्रस्ट च्या वतीने रविवारी २९ मार्च रोजी दुपारी पाच वाजता उत्साहात स्वागत करण्यात आले

प्रभू श्री वैद्यनाथांच्या पवित्र नगरीत गुढीपाडव्याच्या दिवशी 119 वर्षांची परंपरा लाभलेल्या श्री शंभू महादेवाच्या वाघाच्या काठी व कावडीची भव्य मिरवणूक जंगम गल्लीतील मठपती दयानंद स्वामी यांच्या निवासस्थानापासून काढण्यात आली. ही पवित्र काठी माजी आमदार कै. लक्ष्मणराव देशमुख यांच्या गढीवरील देशमुख वाड्यात अकरा दिवसांसाठी विराजमान झाली आहे.

रविवारी सायंकाळी पाच वाजता मठपती दयानंद स्वामी, गणेश स्वामी व अनिरुद्ध स्वामी यांच्या उपस्थितीत देशमुख परिवाराच्या वतीने पारंपरिक आरती व पूजन करण्यात आले. या प्रसंगी प्रा. एस. एल. देशमुख, नागनाथराव देशमुख, विलासराव देशमुख, अभिजीत देशमुख, सुभाष देशमुख, सचिन देशमुख यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

आरतीनंतर श्री शंभू महादेवाच्या वाघाच्या काठी व कावडीचे श्री वैद्यनाथ मंदिरात दर्शनासाठी आगमन झाले. मंदिरात देवस्थान ट्रस्टच्या वतीने सेक्रेटरी प्रा. बाबासाहेब देशमुख यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून स्वागत करण्यात आले. यावेळी विश्वस्त राजेश देशमुख, नागनाथराव देशमुख, अनिल तांदळे आदी उपस्थित होते. त्यानंतर ही काठी पुन्हा जंगम गल्लीकडे नेण्यात आली असून मठपती दयानंद स्वामी यांच्या निवासस्थानी अमावस्येपर्यंत भाविकांसाठी दर्शनासाठी उपलब्ध राहणार आहे.